ePaper

वर्ष - 8 । अंक - 356 | UDYAM-MH-26-0158827

## गेम फिरला, चार दिवसांमध्ये एकनाथ शिंदेंना तीन जबर धक्के



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- विषय गंभीर तिथे रूट खंबीर!
- ९ फलंदाजांनी मिळून घडवला इतिहास
- ऑपरेशन सखलद्वारे दोन अतिरेकी ठार!
- लोकसभा निवडणुकांमध्येही गैरप्रकार


www.mahaenews.com । सोमवार, दि. 4 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**‘हा सूर्य हा जयद्रथ’ !** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालावरून निवडणूक आयोगाने आरसा दाखवला

# राहुल गांधी तोंडावर पडले!

## आयोगाने सर्व संबंधितांना झापले : ‘ईव्हीएम’ मध्ये घोटाळा नाही, विरोधकांकडून ‘हात दाखवून अवलक्षण’

। मुंबई / नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**निवडणूक आयोग हा भाजपाला मते चोरण्यास मदत करतो, भाजपाच्या इशाऱ्यावर चालतो आणि चुकीच्या पद्धतीने भाजपाला विजयी करण्यात निवडणूक आयोगाचा हात असतो, असे वारंवार आरोप करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी आणि उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांना निवडणूक आयोगाने चपराक दिली असून आरसा दाखवत त्यांचे त्यांना तोंडावर पाडले आहे.**



### हा सूर्य आणि हा जयद्रथ..

गेले अनेक दिवस बेछूट आरोप सहन केलेल्या निवडणूक आयोगाने अचानक पुढाकार घेऊन ईव्हीएम मशीन कसे बरोबर आहे, त्यात फेरफार किंवा छेडछाड होऊ शकत नाही, हे सिद्ध करून दाखवले आहे. आयोगावर आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांचे थोबाड त्यामुळे फुटले असून आता बिन पुराव्याचे आरोप करणे त्यांनी बंद करावे, असे आवाहन आयोगाने केले आहे.

### आयोगाने काय केले ?

निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रिया पारदर्शी असल्याचे पटवून देण्यासाठी देशासमोर ४८ बॅलेट युनिट्स, ३१ कंट्रोल युनिट्स, ३१ व्हीव्हीपॅट्स ची सखोल तपासणी केली. दहा मतदारसंघांमध्ये काँग्रेसच्या उमेदवारांच्या तक्रारीवर आधारित मशीन तपासल्या गेल्या. शंभर टक्के निष्कलंक आणि अचूक निकाल आले.

### कुठेही ‘ब्रेकिंग न्यूज’ नाही

निवडणूक आयोगाने एवढी मोठी कामगिरी बजावून आरोप करणाऱ्यांना पटवून दिले, त्यांचा खोटारडेपणाचा बुरखा फाडला. पण, कोणत्याच ‘ब्रेकिंग न्यूज’ चॅनेलने त्यावर एक शब्दही उच्चारला नाही, काँग्रेसला जाब विचारला नाही, याबद्दल निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्यांनी आणि भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

### राहुल गांधी पुन्हा मोकळे

निवडणूक आयोगाने एवढे सारे खटाटोप करूनही त्यावर उलट किंवा सुलट प्रतिक्रिया देण्यासाठी कोणीही विरोधक पुढे आलेला नाही. निवडणूक यंत्रणांवर संशय घेणारे राहुल गांधी मात्र परत पुन्हा ‘लोकशाही मरत आहे ‘चे गाणे गायला मोकळे झाले असल्याची उपासात्मक प्रतिक्रिया सत्ताधाऱ्यांकडून उमटली आहे.

### राहुल यांचे खवखवते रडगाणे

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर संशय घेतला, यंत्रणांवर आरोप लावले, लोकशाही व्यवस्थेवरच आक्षेप पण घेतला. त्यांचे हे वागणे केवळ एका पराभवग्रस्त पक्षाचे खवखवते रडगाणे नाही, तर देशाच्या संविधानात्मक रचनेवर थेट हल्ला आहे. निवडणूक आयोग म्हणजे देशाची निवडणूकसंपन्नता टिकवणारी सर्वोच्च संस्था. त्यावर संशय घेणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटणे आहे, अशी प्रतिक्रिया उमटली आहे. राहुल गांधींची ही भूमिका देशविरोधीही आहे आणि संविधानविरोधी देखील आहे, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

### काँग्रेसच्या तक्रारींची दखल

निवडणूक आयोगाने काँग्रेसने दाखल केलेल्या तक्रारीची दखल घेत १० विधानसभा मतदारसंघात तपासणी केली आणि त्यात काँग्रेसचे खरे रूप दिसून आले. त्यांच्या खोटारडेपणाची लक्तरे वेशीवर टांगली गेली.

### मतदान प्रक्रियेची तपासणी

दि. १७ जून 2025 रोजी निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील दहा मतदारसंघात विशेष ईव्हीएम तपासणी मोहीम जाहीर केली. काँग्रेसच्या पराभूत उमेदवारांनी निवडणूक प्रक्रियेला बदनाम करण्याचा अट्टहास धरला होता. म्हणून आयोगाने संपूर्ण यंत्रणा तपासली. अगदी कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅट स्लिप्स यांचे एकत्रित परीक्षण केले. पण त्या सर्वांची शेवटची टॅली अचूक आली, असून त्यात कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार किंवा छेडछाड दिसून आलेली नाही.

### तपासलेली एकूण यंत्रणा

निवडणूक आयोगाने एकूण ४८ बॅलेट युनिट्स, ३१ कंट्रोल युनिट्स, ३१ व्हीव्हीपॅट्स मशीन तपासली. त्यामध्ये दहा विधानसभा मतदारसंघ, सात जिल्हे, दहा काँग्रेस उमेदवार यांची सविस्तर माहिती आणि झालेले मतदान तपासले. त्यात कोणताही गैरप्रकार आढळून आलेला नाही.

### अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र

जे संशय काँग्रेसच्या नेत्यांनी घेतले होते, त्या सर्व शंकांवर भारताची सर्वोच्च इलेक्ट्रॉनिक संस्था असलेल्या ई सी आय एल च्या अभियंत्यांनी अधिकृत प्रमाणपत्र दिले. त्यांनी म्हटले आहे, की सर्व मशीन तपासण्यात आल्या असून, कुठेही कोणताही दोष नाही.’ त्यांच्या या प्रमाणपत्रामुळे आक्षेप घेणारेच आता वाटा शोधून पळू लागले आहेत.

### कशातही तफावत नाही, 100 टक्के अचूक

व्हीव्हीपॅट स्लिप्स आणि कंट्रोल युनिट मधील मतांची जुळवणी पूर्णतः शंभर टक्के जुळली. कोणतीच तफावत आढळून आलेली नाही. त्यानंतर आयोगाने म्हटले आहे, की मशीन योग्य आहेत, अभियंते म्हणतात दोष नाही, मतांच्या स्लिप्स शंभर टक्के जुळतात आणि असे होऊन देखील सर्वोच्च न्यायालयातून काँग्रेस पक्ष पळ काढतो.

### भ्रम पसरवण्याचा धंदा

तरीही राहुल गांधी आणि त्यांचे प्रवक्ते अजूनही “लोकशाही संपली” म्हणत देशात भ्रम पसरवत आहे. हा केवळ पराभव झाकण्याचा प्रयत्न नाही. हा देशातील निवडणूक व्यवस्थेवर, संविधानावर आणि जनतेच्या निर्णयावर थेट आघात आहे, असे राजकीय विश्लेषक आणि घटनातज्ज्ञांनी मत नोंदविले आहे

### प्रादेशिक माध्यमांचे मौन..

भाजपाच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार, प्रादेशिक माध्यमांचे मौन हे राहुल गांधींची आणि काँग्रेसची गुलामगिरी करण्याचा हिमनग आहे. माध्यमांना प्रश्न एवढाच आहे, जेव्हा आयोग राहुल गांधींना अधिकृत पत्र लिहितो, तेव्हा ती ब्रेकींग न्यूज ठरते ? जेव्हा राहुल गांधी ट्विट करतात तेव्हा ती ब्रेकींग न्यूज ठरते, जेव्हा आयोग तपासणी करून अहवाल देतो, जेव्हा निवडणूक आयोग स्वतः म्हणतो की ईव्हीएम ठीक आहेत, तपासणी पूर्ण झालेली आहे.

### निवडणूक आयोगाचे आव्हान..!

ईव्हीएम मशीन खोटे निकाल देते हे सिद्ध करण्याचे किंवा त्यात काही छेडछाड केली जाऊ शकते हे देखील कोणीही स्पष्ट करून दाखवावे असे आव्हान पूर्वी निवडणूक आयोगाने दिले होते. शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, आणि आप पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांनी हे आव्हान स्वीकारले होते, त्यासाठी मुदतही मागवून घेतली होती. त्यांनी जगातील अनेक तज्ज्ञांची सल्ला मसलतही केली पण शेवटी हाराकिरी पत्करून  त्यांनी गप्प बसणे मान्य केले, याची आठवण निवडणूक आयोगाने करून दिली आहे.

## पुरंदर भूसंपादन तीन तरुणीचा आरोप, पोलीस आयुक्त कार्यालयात ठिय्या

# पोलिसांकडून जातीवाचक भाषा!

## तीन तरुणीचा पोलिसांवर आरोप



।पुणे।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्रपती संभाजीनगर येथील एक तरुणी सासरच्या त्रासाला कंटाळून पुण्यात आली होती. तर त्या तरुणीला कोथरूड येथील तीन तरुणींनी त्यांच्या फ्लॅटमध्ये एक दिवस राहू दिले. त्यानंतर ती तरुणी तेथून निघून गेली. त्याच दरम्यान त्या तरुणीच्या सासरच्या मंडळींनी सून हरवल्याची तक्रार दिल्यानंतर ती तरुणी पुण्यात असल्याची माहिती छत्रपती संभाजीनगर येथील पोलिसांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे छत्रपती संभाजीनगर येथील पोलिस पुण्यात आले. त्यावेळी पुणे पोलिसांच्या कोथरूड येथील पोलिस स्टाफ सोबत घेऊन तीन तरुणींच्या फ्लॅटमध्ये जाऊन पाहणी केल्यावर त्या तिघींना पोलिस स्टेशनमध्ये जबाब नोंदविण्यास आणण्यात आले.**

आमच्या तिघीसोबत पोलीस अधिकाऱ्यांनी जातीवाचक भाषा वापरली. आमची चूक नसताना पोलीस स्टेशनमध्ये बराच वेळ बसून ठेवले. आम्हाला नाहक त्रास देण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आम्ही पोलिस आयुक्त कार्यालयाच्या आवारात ठिय्या आंदोलन करीत असल्याचे पीडित तरुणींनी सांगितले. त्या तरुणींची शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी भेट घेऊन त्यांच्या सोबत घडलेल्या घटनेची माहिती त्यांनी जाणून घेतली.यावेळी रोहित पवार म्हणाले की, कोथरूड भागात राहणाऱ्या तीन तरुणींचे कोणत्याही प्रकारची चूक नसताना, पोलिस घरात घुसले आणि त्यांच्या सोबत चुकीच्या पद्धतीची भाषा वापरली. ज्या पोलिस अधिकाऱ्यांकडून अशी पद्धतीची भाषा वापरली गेली त्या अधिकाऱ्यांवर करावईच्या मागणीसाठी या तरुणी कित्येक तास पोलिस आयुक्त कार्यालयाच्या दारात बसून आहे. या तरुणींच्या मागणीची दखल घेऊन पोलीस आयुक्तांनी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीदेखील त्यांनी केलीमहादेव मुंडे यांची

## रोहित पवार यांची पोस्ट काय?


१८ फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महादेव मुंडे कुटुंबियांची परळीत येत भेट घेतली. यावेळी बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर हे देखील त्यांच्यासोबत होते. २२ फेब्रुवारीला सुरेश धस यांनी महादेव मुंडे कुटुंबियांची भेट घेत या प्रकरणात त्यांची साथ देणार असल्याचे सांगितले.

हत्या २१ ऑक्टोबर २०२३ ला करण्यात आली होती. या हत्येला २१ महिन्यांहून अधिक कालावधी उलटला तरीही आरोपी मोकाट आहेत. या प्रकरणी महादेव मुंडेंच्या पत्नी आणि मुंडे कुटुंबाने नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना कारवाईचं आश्वासन दिलं होतं. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणातला मुख्य आरोपी देश सोडून जाण्याच्या तयारीत आहे अशी पोस्ट केली आहे.महादेव मुंडे हत्या प्रकरणात मुंडे कुटुंबीयांना ज्या आरोपीवर मुख्य संशय आहे, तो आरोपी देश सोडून जाण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती कळत असून पोलीस यंत्रणांनी यासंबंधित खातरजमा करून त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे. आज उद्या पोलिसांनी या आरोपीच्या मुसक्या आवळल्या नाही तर आरोपी पसार होण्याची शक्यता आहे. मुंडे कुटुंबाला मुख्यमंत्री साहेबांनी दिलेल्या आश्वासनानुसार SIT मध्ये पोलीस अधिकारी संतोष साबळे यांचा अद्यापही समावेश झालेला नाही, अशी पोस्ट रोहित पवार यांनी केली आहे.महादेव मुंडे यांची २१ ऑक्टोबर २०२३ या दिवशी हत्या झाली. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात विधानसभेत आवाज उठवणारे आमदार सुरेश धस यांनी परळीतील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरण सर्वात पहिल्यांदा समोर आणलं.

# मोडी लिपीतील महत्त्वाची नोंद उजेडात

## मोडी लिपीतील इतिहास अभ्यासक राज मेमाणे यांचे संशोधन





।पुणे।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या निधनाच्या शतकानंतरही रायगडावर दररोज संध्याकाळी तख्ताच्या दोन्ही बाजूला दोन दिवे आणि दिवटी म्हणजेच मशाल लावून रीतसर मुजरा केला जात असे. याबाबत 'जोहार दिवटी मुजऱ्याचे समयी' अशी नोंद मोडी कागदपत्रांमध्ये सापडते. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.**

छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन १६८० मध्ये झाले आणि या नोंदी १७७३ नंतरच्या म्हणजे १८ व्या शतकातील आहेत. तब्बल शंभर वर्षांच्या काळानंतर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल, त्यांच्या तख्ताबद्दल लोकांमध्ये प्रचंड आदर होता,' अशी माहिती इतिहास अभ्यासक व मोडी लिपी तज्ज्ञ राज मेमाणे यांनी दिली.नो डॉक्युमेंट्स नो हिस्टरी' आणि श्री मल्हार पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'दुर्गराज रायगड : एक नवा दृष्टिक्षेप' या विषयावर भारत इतिहास संशोधक मंडळाच्या इतिहासाचार्य वि. का. राजवाडे सभागृहात राज मेमाणे यांचे व्याख्यान झाले.

त्यावेळी श्रीडी चित्रांच्या

## एक उत्तम संदर्भ ग्रंथ म्हणून नोंद

कैद्यांसाठी खोल्या, समुद्राच्या फेसाच्या दगडाचा वापर करून तयार केलेला सोपा, राजवाड्यातील हौद तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या तख्ताची सदर, विवेकसभा अशा अनेक इमारतींचे उल्लेख मोडी कागदपत्रांतून सापडतात.पांडुरंग बलकवडे म्हणाले, यांनी पुणे पुरालेखागारातील मोडी कागदपत्रांवर आधारित लिहिलेल्या 'महाराजांचा रायगड' या ग्रंथाची इतिहासातील एक उत्तम संदर्भ ग्रंथ म्हणून नोंद राहील.

माध्यमातून मेमाणे यांनी विषयाची मांडणी करताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीच्या नव्या पैलूवर प्रकाश टाकला. ज्येष्ठ इतिहास अभ्यासक आणि मंडळाचे चिटणीस पांडुरंग बलकवडे, पेशव्यांचे वंशज पुष्कर पेशवा, चित्रपट दिग्दर्शक तुषार शेलार, संदीप पोतनीस आणि युवराज मेमाणे या वेळी उपस्थित होते. राज मेमाणे म्हणाले, 'अठराव्या शतकातील रायगड किल्ला आणि शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ला यामध्ये फरक आहे. किल्ल्याचे महत्त्व अबाधित होते. ते केवळ लढण्याचे साधन नव्हते. तर, आर्थिक घडामोडींचे ठिकाण होते.

भर दिवसा गोळीबार

पिंपरीतील व्यापारी आक्रमक; रात्र पोलीस गस्त वाढवावी

# संरक्षण द्या अन्यथा पिंपरी कॅम्प बंद ठेवणार!

## उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी; गुरुवारी बाजारपेठ बंद ठेवण्याचा इशारा

। पिंपरी-चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी कॅम्प परिसरात शुक्रवारी झालेल्या गोळीबार घटनेतील आरोपींना अटक करून कायदेशीर कडक कारवाई करावी, तसेच व्यापाऱ्यांच्या समस्या समजून घेऊन ज्यांना गरज आहे त्यांना पोलीस संरक्षण द्यावे आणि बाजारपेठांमध्ये दिवस, रात्र पोलीस गस्त वाढवावी अन्यथा गुरुवारी बाजारपेठ बंद करण्यात येईल असा इशारा पिंपरी मर्चंट फेडरेशनच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले आहे.**



दरम्यान फेडरेशनने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनादेखील निवेदन देऊन पिंपरी कॅम्पात गस्त वाढवण्याची मागणी केली आहे.

तसेच पत्र फेडरेशन ने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयात दिले आहे. या पत्रात पुढे म्हटले आहे की, शहरातील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांचा अंकुश राहिला नाही. यामुळे व्यापारी भयभीत झाले असून त्यांच्या वित्त व जीवितहानी विषयी भीती निर्माण झाली आहे. याकडे पोलिस प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः लक्ष घालून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांना स्पष्ट आदेश द्यावेत अशीही मागणी पिंपरी मर्चट फेडरेशनचे अध्यक्ष उद्योजक श्रीचंद शामनदास आसवाणी यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी यांनी दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे. शहरातील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांचा अंकुश राहिला नाही. यामुळे व्यापारी भयभीत झाले असून त्यांच्या वित्त व जीवितहानी विषयी भीती निर्माण झाली आहे. याकडे पोलिस प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः लक्ष घालून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांना स्पष्ट आदेश द्यावेत.

### व्यापारी वर्गात दहशत

शुक्रवारी पिंपरीतील एका युवा व्यापाऱ्यावर अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केला यामध्ये व्यापारी जखमी झाला आहे. या घटनेमुळे पिंपरी चिंचवड मध्ये एकच खळबळ उडाली. पिंपरी बाजारपेठ परिसरात यापूर्वी देखील व्यापाऱ्यांवर दहशत बसवण्यासाठी अशा प्रकारच्या काही घटना घडल्या आहेत. त्याबाबत व्यापाऱ्यांनी वेळोवेळी पोलिसांना पिंपरी मर्चंट फेडरेशनच्या वतीने निवेदन देऊन पोलीस संरक्षण व पोलीस गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. तरी देखील पोलिस प्रशासन दखल घेत नाही आता फेडरेशनने थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे तक्रार केली आहे.

# पिंपरी पालिकेचे निवारा केंद्र निराधारांसाठी ठरतेय आधार

## अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी निवारा केंद्राची केली पाहणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवारा केंद्राने बेघर, रस्त्यावर फिरणाऱ्या आजारांनी त्रस्त असणाऱ्या कुटुंबाने सोडून दिलेल्या अनेक निराधारांना समाजाच्या प्रवाहात परत आणण्याचं काम निःस्वार्थपणे हाती घेतले आहे. रिअल लाइफ रिअल पीपल या संस्थेच्या सहकार्याने चालवण्यात येत असलेल्या या "सावली निवारा केंद्राला" अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी नुकतीच भेट दिली.**



लाभार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधत, त्यांच्या अवस्था समजून घेत त्यांना नव्या उमेदीनं जगण्याची ऊर्जा दिली. सावली' निवारा केंद्रात सध्या निराधार, बेघर, मानसिकदृष्ट्या आजारी, तसेच रस्त्यावर सापडलेले वंचित पुरुष आणि महिलांना सुरक्षित निवारा, अन्न, औषधोपचार आणि सल्लामसलत सेवा मोफत दिली जाते. या केंद्रात सध्या विविध वयोगटातील लाभार्थ्यांचा निवास आहे. काहींच्या डोळ्यात अजूनही काळजी आहे, पण तितकीच असते इथल्या माणसांच्या आपुलकीची जाणीव. या केंद्रातील कर्मचारी केवळ सेवा नाही, तर प्रेमाची आणि समजूतदारपणाची ऊबही देतात. या निवारा केंद्राला अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी भेट दिली. केंद्रामध्ये प्रवेश करताच जांभळे पाटील यांचे स्वागत केंद्रामध्ये असणाऱ्या लाभार्थी महिलांनी गुलाबाचे पुष्प देऊन केले. त्यानंतर जांभळे पाटील यांनी या सर्वांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे एम. ए. हुसैन व व्यवस्थापक गौतम थोरात, सहाय्यक व्यवस्थापक सचिन बोधनकर, समाजसेवक अॅग्नस फ्रान्सिस, एच. शहानवाज, काळजीवाहक अमोल भाट, लक्ष्मी वाईकर, विष्णू गायकवाड, कुक उमा भंडारी, लक्ष्मी कांबळे उपस्थित होते. यासर्वांच्या कामाचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला.


"तुम्हाला केंद्रामध्ये कसे वाटत आहे? येथील जेवण कसे आहे? तुम्ही येथे कसे पोहोचलात?" अशी आपुलकीने जांभळे पाटील यांनी लाभार्थ्यांची विचारपूस केली. यावेळी लाभार्थ्यांनी केंद्रामध्ये उत्तम सोयीसुविधा मिळत असल्याचे सांगत त्याबद्दल पिंपरी चिंचवड महापालिका व रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे आभार मानले. "आम्हाला येथे काही अडचण नाही. हे केंद्र म्हणजे आमचा परिवार आहे. येथे आम्हाला अन्न, वस्त्र, निवारा सर्व काही मिळाले आहे. आम्ही येथे आनंदात आहोत. येथे आमची खूप काळजी घेतली जाते," अशा भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या.

"नागरी बेघरांसाठी निवाऱ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी राज्य शासनाने गठीत केलेल्या निवारा सनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार त्रिशरण एनलायनमेंट फाउंडेशनने विविध निवाऱ्यांचे परीक्षण करून अहवाल सादर केला. या अहवालात सावली बेघर निवारा केंद्र हे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वोत्तम निवाऱ्यांपैकी 'प्रथम क्रमांकावर' असल्याचे घोषित करण्यात आले आहे. आज पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि उपायुक्त ममता शिंदे यांनी या केंद्राला भेट दिली असून ही भेट आमच्या संस्थेतील निराधार आई-वडिलांसाठी आश्वासक ठरली असून यातून आम्हाला अधिक जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे.
– **एम. ए. हुसैन,** संस्थापक अध्यक्ष, रिअल लाइफ रिअल पीपल

### निवारा केंद्रासाठी मदत पुरवण्याचे निर्देश

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सावली केंद्राची पाहणी करून तेथे दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधांची माहिती घेतली. केंद्रामध्ये लाभार्थ्यांच्या निवासासाठी असणारे हॉल, स्वयंपाकघर, लाभार्थ्यांना पुस्तके वाचण्यासाठी करण्यात आलेली सुविधा, सीसीटीव्ही व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, स्टोअर रूम अशा विविध ठिकाणांची पाहणी जांभळे पाटील यांनी करून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी केंद्रांत येण्यासाठी रॅम्पची व्यवस्था, लाभार्थ्यांना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी गाडीची व्यवस्था, विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर बॅटरी बॅकअपची व्यवस्था करण्याबाबत तातडीने निर्देश महापालिकेच्या संबंधित विभागांना जांभळे पाटील यांनी दिले. केंद्रातील लाभार्थ्यांना जास्तीतजास्त शासकीय योजनांचा लाभ द्या, ज्या लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसेल तर ते काढण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करा, केंद्रामध्ये जास्तीतजास्त सोयीसुविधा द्या, असे निर्देशही दिले.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### भगवंताशी एकरूप झाल्यावर सर्व आनंदच आहे

भक्त झाल्यावर माणूस ज्या आनंदात असतो तो आनंद वर्णन करून समजणार नाही. जिथे दु:खच नाही तिथे आनंद हा शब्द तरी सांगायला कोण असणार ? अनन्य भक्त व्हावे आणि तो आनंद पहावा. भक्ताला सर्वच ठिकाणी आपण आहोत असे दिसते; म्हणजे सर्व चराचर वस्तू तो भगवद्रूपच पहात असतो. एखाद्या खोलीत सर्व बाजूंनी आरसे ठेवलेले असले, तर कुठेही पाहिले तर आपल्याला काय दिसेल ? आपल्या स्वत:शिवाय दुसरे काहीच दिसणार नाही. म्हणजे, सर्व ठिकाणी एकभाव झाला तिथे दु:खाचे कारणच नाही. तिथे सर्वच आनंद असतो. त्याप्रमाणे, भक्त भगवंताशी एकरूप झाला तिथे आनंदाशिवाय दुसरे काय असणार ? जे याप्रमाणे जगात वावरतात, ते आपल्या आनंदात राहूनही इतर लोकांप्रमाणे वागत असतात. तुकारामांनी अशा स्थितीत राहून लोकांना सन्मार्ग दाखविला. समर्थांनीही ती स्थिती सांभाळून सर्व जगाचा व्यवहार केला आणि इतर लोकांना आपल्या पदाला नेले. आपण कधी त्या आनंदाकडे जाण्याचा मार्ग पाहिलेला नाही. म्हणून, ज्यांनी तो आनंद पाहिला आहे आणि जे सदैव त्या आनंदातच रहातात, त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर आहे; म्हणजेच गुरुआज्ञेप्रमाणे वागावे. आपल्याला वाटाड्या भेटला म्हणजे त्याच्यावर विश्वास ठेवून आपण चालतो, त्याप्रमाणे गुरूंच्या वचनावर विश्वास ठेवून आपण वागावे म्हणजे आपले हित होते.

एखाद्या आंधळ्या माणसाने साखर समजून जर मीठ खाल्ले, तर ते खारट लागल्यावाचून राहणार नाही. त्याप्रमाणे, आनंद मिळेल या कल्पनेने आपण विषयाची संगत धरली, पण त्यापासून दु:खच प्राप्त झाले. पुष्कळ वस्तू मिळाल्या तर त्याने पुष्कळ सुख मिळते असे मानणे हा भ्रम आहे. खरे किंवा पुष्कळ सुख म्हणजे कायमचे, सनातन सुख होय. ते सनातन वस्तूपाशीच, म्हणजे भगवंतापाशीच असते. भगवंताचे आपण झाल्यास सुखी होऊ. तोंड गोड करण्यासाठी जशी साखर खावी लागते, तसे आनंद प्राप्त होण्यासाठी नाम घ्यावे लागते. आपण प्रपंच दुसऱ्याचाच करतो, आपला करीतच नाही. एखाद्या शेतापेक्षा कुंपणालाच जास्त खर्च यावा, त्याप्रमाणे आपण आपल्या मूळ स्वरूपापेक्षा आपल्या उपाधींचीच जास्त आरास करतो. आपण सर्व मिळवतो, पण सर्व ठेवून जावे लागते. आपल्या फायद्याचे केले तरच आपला प्रपंच ; भगवंताचे स्मरण तेवढाच आपला प्रपंच. आपण आईबापांवर, नवराबायकोवर, मुलांवर, नातेवाइकांवर, शेजाऱ्यापाजाऱ्यांवर सुखासाठी अवलंबून राहिलो तर सुखी होणार नाही. आपले दु:ख किंवा यातना जर कोणी नाहीशा करीत नाही तर मग दुसरा कोणी आपल्याला सुख देईल ही कल्पना कशी खरी ठरेल ?

**बोधवचन:- परमात्म्याचा आनंद अखंड मिळावा, मी त्याचा व्हावे, ही दृष्टी ठेवून नामस्मरण करावे.**

# ‘महायुती’ त काहीतरी घडतंय, सारखं सारखं का बिघडतंय?





**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही महिन्यात, नव्हे काही वर्षात, असे काही पाहायला मिळाले आणि त्या मागील राजकारणातील दोष आणि कारस्थाने डोके चक्रावून टाकणारी ठरली. २०१९ मध्ये महाराष्ट्रात स्वाभाविक मोठा घाव बसलेल्या भाजपला आणखी तीन वर्षात आपणच सत्तास्थापनेत यायचे असे वाटायला लागले आणि पडलेले सुंदर स्वप्न साकारण्याची वेळ आली आणि त्यांनी ती संधी अचूक साधली !**

**महाविकास आघाडीचा प्रयोग..**

पण, त्याच वेळेस सत्ता स्थापनेच्या निमित्ताने नवी महाविकास आघाडी आली आणि सत्तेची बाजू घेतली गेली. परिणामी महाविकास आघाडीचा अनोखा प्रयोग झाला आणि तो सत्तेत येऊन यशस्वी झाला, असे वाटले. अशक्य असलेली गोष्ट शक्य झाली. शिवसेना आणि काँग्रेस त्यानिमित्ताने एकत्र आले. विचार एकच होता सत्तेपासून भाजपाला दूर ठेवायचे! पण त्याच दरम्यान ढवळाढवळ सुरू झाली आणि एक मोठा भाग दुसऱ्या आघाडीत सामील झाला. त्यामुळे सत्तेचे गणित बदलले आणि महाविकास आघाडीचा गाजलेला प्रयोग सपशेल फसला, असे वाटायला लागले.

**पुन्हा नवे समीकरण...**

त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एक नवीन समीकरण आले. ते समीकरण म्हणजे एकनाथ शिंदेंचा भूकंप ! या भूकंपाने सत्तेत फक्त ढवळाढवळ झाली नाही, तर थेट सत्ताच बदलली. ढवळाढवळ म्हणजे स्फोट असतोच असतो. पण, स्फोट झाला, तरी तितका मोठा आणि कायमस्वरुपी होतोच असेही नाही. पण एकनाथ शिंदे यांनी घडवून आणलेला स्फोट अनेकांच्या मनाला खोलवर जखमा करून गेला. एवढेच नव्हे तर कटू राजकारणाचा अनुभव देऊन गेला.

**‘महायुती’ पातळीवर बरेच काही..**

आजही स्थायी स्वरूपाचे, विश्वासार्हतेचे ‘महायुती’ पातळीवर बघितले, तर बरेच काही शिल्लक आहे. विशेषतः घडताना खूप काही दिसत आहे. त्यामुळे तात्पुरता आणि सुरुवातीचा सत्तास्थापनाचा उद्देश आहे. पण, वस्तुतः दररोजचभूकंप चालू आहे. त्यामुळे दुर्दैवाने म्हणावे वाटते, की आजही,’महायुती’ त काहीतरी खडबडत आहे नीतीमत्ता कोलमडत आहे.

**सार्वजनिक कार्यक्रमातच टोले..**

कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात ‘महायुती’ चे नेते हे एकत्र असतील, असे हृदयापासून सर्वांना वाटत असते. ते कधीच संवाद साधताना दिसत नाहीत हे बरे वाटत नाही ! माध्यमांमधूनही याचेच चित्र समोर येते. हे चित्र सुन्न करणारे नक्कीच आहे. ‘महायुती’ मध्ये तरी एकसंधपणे पुढे जाणे सुसंभव वाटत नाही. कारण, ‘महायुती’ च्या निमित्ताने अस्तित्व टिकवायचे चित्र दिसून येते. उदाहरण द्यायचे तर एकनाथ शिंदेंचे देऊ या. थोडक्यात,अर्थ स्पष्ट करायचा झाला तर, महायुतीमुळे त्यांची ताकद वाढली आहे. पण, ते महायुती बरोबर एकसंध झालेले दिसत नाहीत. त्यांच्या मंत्र्यांची आणि आमदारांची वागणूक सवता सुभा मांडल्यासारखी आहे. मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणण्यासाठीच आपण एकत्र आलो आहोत हे त्यांच्या मनात कायम आहे!

**तुमचा हेकटपणा पण सरकार अडचणीत..**

एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांमधील समृद्धीचा अभाव आणि हेकटपणा वारंवार पुढे येतो आणि मुख्यमंत्र्यांची मात्र कसरत होते, याला काय म्हणायचे? त्यांना आपल्या मूळ पक्षात परतायचे आहे का, असा प्रश्नही येऊन जातो. परंतु, सत्तेतील दार उघडे असल्यामुळे परतीचा दरवाजा बंद आहे, हे त्यांनाच काय एकनाथ शिंदे यांनाही माहीत आहे.

**आपल्याच सरकार विरोधी वक्तव्य..**

जी गोष्ट एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची तीच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची! सरकारमधील एखादी गोष्ट पटली नाही तर ती आपल्या नेत्याला सांगावी. पण तसे न करता हे आमदार किंवा मंत्री थेट सार्वजनिक ठिकाणी बोलून मोकळे होतात आणि आपल्या नेत्याला तसेच मुख्यमंत्र्याला वेळोवेळी अडचणीत आणतात. नावे कुणाची घ्यायची ? मंत्रिमंडळात फेरबदल करून हे प्रश्न सुटणारी नाहीत तर कायमची शस्त्रक्रिया केल्याशिवाय हा कॅन्सर हटणार नाही!

**भाजपामध्ये ही बेछूट नेते..**

शिंदे आणि अजितदादांच्या मंत्र्यांवर, आमदारांवर काही कारवाई होत नाही, हे लक्षात आल्यामुळे भाजपचेही अनेक नेते अस्वस्थ आहेत तर अनेकांचे तोंड सुटले आहे. त्यामुळे ‘महायुती’ त चाललेले हे सगळे महाभूकंपाचे चित्र आहे, असे नकळत वाटून जाते. आजच्या सत्तेचे राजकारण हे केवळ अस्तित्वावर टिकून आहे. त्यामुळेच विरोधी पक्षामध्ये आजही अस्वस्थता आहे. कदाचित, त्यामुळेच अनेक नेते आजही विरोधकांकडे वळताना दिसत आहेत.

**राज्याचे राजकारण अस्पष्ट आणि धूसर..**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मन मोकळेपणाने काम करण्यास द्यायचे नाही, असे ठरवूनच जणू काही मित्र पक्षाच्या मंत्र्यांनी शपथ खाल्लेली दिसते. तिकडे, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल एकनाथ शिंदेंच्या विरोधात गेल्यास शिंदे यांना पुन्हा नव्याने एकत्र येणे गरजेचे आहे, असे वाटून जाते. सध्या मात्र ‘महायुती’ चे चित्र अतिशय अस्वस्थ करणारे आहे. हे चित्र पुढे काय परिणाम करणार, हे सांगता येत नाही. पण त्याचे परिणाम वाईटच होणार आहेत, हे नक्की !

**एकनाथ शिंदे गट अस्वस्थ..**

महाराष्ट्राच्या एकूण राजकारणात एकनाथ शिंदे यांचा पक्ष आणि गट अतिशय अस्वस्थ आणि नाराज असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. स्वतः एकनाथ शिंदे यांच्यासाठी ते चित्र बरे नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांना अडचणीत आणण्यासाठी हा डाव खेळला जात आहे का? याचे उत्तर लवकरच मिळेल. मुख्यमंत्री शिंदेंनी आपल्या मंत्र्यांना त्यांच्या खात्यावर विश्वास दिला पाहिजे. अन्यथा, ही अस्वस्थता सत्तेचे समीकरण बदलणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने सुद्धा हे चित्र वेगळे होणार आहे, याचा विचार केला गेला पाहिजे.

**अजितदादांचे तिसरेच..**

जी गोष्ट एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांची आहे तीच अजितदादांच्याही ! फडणवीस, शिंदे आणि अजित पवार हे सत्तेच्या घट्ट दोरीमुळे एकत्र आहेत..विकास कामांमुळे आणि मनांमुळे एकत्र आहोत, असे त्यांनी जनतेला दाखवले पाहिजे. नाहीतर जनतेचा विश्वास या सरकार वरील उडत चालला आहे..तो कायमचा उडेल, आणि आगामी महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्याचा प्रचंड फटका बसल्याशिवाय राहणार नाही, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.




# महाकुंभातील भक्त मोदींवर नाराज का?



**“माझ्या बायकोच्या अंगावर १००- २०० जण पडले. आमचे कपडे सामान सारं काही चोरीला गेलं. आम्हाला इथे मारण्यासाठी बोलावलं आहे का? योगी फक्त साधुसारखे कपडे घालतात. साधूचे काही गुण नाहीत त्यांच्यात...” महाराष्ट्रातून आलेला एक तरुण अतिशय उद्वेगाने सांगतो. “आम्ही इथे गंगा स्नानासाठी आलो, पण घाटापर्यंत पोहोचूच दिलं जात नाही.**

जिथे जावं तिथे रस्ता बंद असतो. काहीच व्यवस्था नसताना योगींनी इथे येण्याचं आवाहन का केलं? पुन्हा कधीही कुंभमेळ्याला येणार नाही.” गुजरातच्या लता शर्मा संतापलेल्या दिसतात. हे व्हिडीओ अनुक्रमे ‘बीईंग सुमीत ००७’ आणि ‘विशाल अगरवाल’ यांच्या एक्स हँडलवर पोस्ट करण्यात आले आहेत. असे अनेक व्हिडीओ सध्या विविध समाजमाध्यमांवर प्रसारित झाले आहेत. ‘द फायनान्शिअल एक्स्प्रेस’च्या वृत्तानुसार उत्तर प्रदेश सरकारने महाकुंभाच्या आयोजनासाठी सहा हजार ९९० कोटी रुपयांची तरतूद केली होती आणि मेळ्यामुळे सरकारच्या तिजोरीत २५ हजार कोटींची भर पडण्याचा अंदाजही वर्तवला गेला होता. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छायाचित्रं असलेल्या दणदणीत जाहिरातीही केल्या गेल्या. मात्र मौनी अमावास्येला झालेल्या दुर्घटनेत हे सारे दावे गंगेत वाहून गेले आणि समाजमाध्यमांवर हे दावे खोडून काढणाऱ्या पोस्टचा पूर आला. महाकुंभ सुरू होण्यापूर्वी तिथे उभारलेल्या ‘टेन्ट सिटी’ची कौतुकं अनेक वृत्तवाहिन्यांनी केली. तीन हजार स्वयंपाकघरं, २४ तास वीज-पाणी, ११ रुग्णालयं, ५० हजार सुरक्षा कर्मचारी, अडीच हजार सीसीटीव्ही कॅमेरे असे डोळे दिपविणारे आकडे सर्वत्र झळकत होते. मेळा सुरू झाल्यानंतरही सुरुवातीचे काही दिवस सारं सुरळीत सुरू होतं. मात्र गर्दी वाढत गेली आणि भव्यदिव्य व्यवस्था तोकडी पडू लागली. १९ जानेवारीला मेळ्यात आग लागली, २८ जानेवारीला चेंगराचेंगरी आणि ३० जानेवारीला पुन्हा आग. कुरबूर, नाराजीचं प्रतिबिंब टीव्ही वाहिन्यांच्या आधी समाजमाध्यमांवर उमटू लागलं. आपले नातेवाईक हरवल्याचं आणि पोलीस ठाण्यांपासून रुग्णालयांपर्यंत सर्वत्र चौकशी करूनही ते सापडले नसल्याचं सामान्य नागरिक, सांगत आहेत. गैरसोयींबद्दल योगी, मोदी आणि पोलिसांना दोष देत आहेत.एका घाटाकडून दुसऱ्या घाटापर्यंतचा प्रवास सुकर व्हावा म्हणून गंगेवर ३० तात्पुरते पूल उभारण्यात आले आहेत. या पुलांना क्रमांक देण्यात आले आहेत. घाटांवर उंच खांब उभारून त्यावरही क्रमांक टाकण्यात आले आहेत. जेणेकरून स्नानासाठी गेलेल्या व्यक्तींना आपलं सामान कुठे ठेवलं आहे, आपल्याबरोबरची माणसं कुठे थांबली आहेत हे शोधणं शक्य व्हावं. महाकुंभाच्या सुरुवातीच्या काळात रेल्वे स्थानकापासून घाटाच्या अगदी जवळपर्यंत खासगी वाहनं नेता येत होती. मात्र जसजसं अमृतस्नान जवळ येऊ लागलं तशी गर्दी वाढू लागली. मग खासगी वाहनं १०-१२ किलोमीटर दूरवरच्या वाहनतळावर थांबविण्यास सांगितली जाऊ लागली. तिथून पुढचा प्रवास ई-रिक्षाने करण्याची सुविधा होती. मात्र अमृतस्नानाच्या दोन-तीन दिवस आधी ई-रिक्षालाही प्रवेश बंद करण्यात आला. परिणामी आबालवृद्धांना १२-१५ किलोमीटर पायपीट करणं अपरिहार्य ठरलं. नाराजीचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हाच असल्याचं समाजमाध्यमांतल्या प्रतिक्रियांतून स्पष्ट होतं. ‘क्रेडिबल हिस्ट्री’ या यूट्युब चॅनलवर महाकुंभात सहभागी झालेली एक महिला सांगत होती, “आमची गाडी २० किलोमीटर दूर उभी करावी लागली. आम्ही संध्याकाळी ४ पासून चालतोय आता मध्यरात्र झाली तरी स्नान झालेलं नाही. पूल बांधले आहेत ते बंद ठेवण्यासाठीच का? फक्त व्हीआयपीच माणसं आहेत का? आम्ही माणसं नाही?” हे ‘व्हीआयपी कल्चर’ हा महाकुंभात प्रचंड रोषाचा मुद्दा ठरत आहे. गृहमंत्री अमित शहा, योगी आदित्यनाथ, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, संसदीय कार्यमंत्री किरण रिजीजू, बाबा रामदेव, हेमा मालिनी, अनुपम खेर, शंकर महादेवन, गुरु रंधावा, रेमो डिसुझा सारखे सेलिब्रिटी सुखेनैव स्नान करतात.“माझ्या बायकोच्या अंगावर १००- २०० जण पडले. आमचे कपडे सामान सारं काही चोरीला गेलं. आम्हाला इथे मारण्यासाठी बोलावलं आहे का? योगी फक्त साधुसारखे कपडे घालतात.

## प्रासंगिक »

### पायाच पोकळ!

***अनास्थेची लागण प्रत्यक्ष एखाद्या साथीच्या रोगापेक्षाही भयानक असते. राज्यातील कथित प्रगत शहर पुणे सध्या याचा अनुभव घेते आहे.***

पुण्यामध्ये गुइलेन बॅरे सिंड्रोमनामक (जीबीएस) आजाराची लागण होण्याचे प्रमाण प्रचंड आहे. हा आजार नवीन नाही, पण त्याचे रुग्ण ज्या प्रमाणात वाढताहेत, ते मात्र घाबरवणारे आहे. हे प्रमाण कशामुळे वाढते, याच्या खोलात गेल्यावर जे दिसते, ते राजकीय हव्यासाचे आणि प्रशासकीय अनास्थेचे कुणाच्या खिजगणतीत तरी आहे का, हा प्रश्नच. विदर्भाच्या वाट्याला आलेल्या अनास्थेचा अनुशेष काही भरून निघायला तयार नाही.पुण्यातील या ‘जीबीएस’नामक आजाराची लागण होणे खरे तर नवीन नाही. दूषित पाणी वा अन्नामुळे पचनसंस्थेत बिघाड होऊन एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर शरीरात शिरलेल्या विषाणू व जिवाणूंशी मुकाबला करणारी शरीरातील रोगप्रतिकारशक्ती काही वेळा अनाकलनीयपणे इतकी प्रचंड वाढते, की शिरलेले विषाणू व जिवाणू मेल्यानंतर या वाढलेल्या प्रतिकारशक्तीला काय करायचे, हे उमजत नाही.

अमेरिकेत अध्यक्षपदी ट्रम्प यांचे पुनरागमन,बेरोजगारी, गडगडत असलेला रुपयाचा विनिमय दर आणि निर्यातीपेक्षा सातत्याने वाढणारी आयात यासारखी अनेक आव्हानं अर्थमंत्र्यांसमोर अर्थसंकल्प सादर करतांना असतील आणि तीच त्यांची परीक्षा पाहणारी ठरतील. वर्ष २०२४-२५ मध्ये निवडणुकांमुळे दोन अर्थसंकल्प सादर केलेले होते.

# काय आहेत येत्या अर्थसंकल्पाकडून अपेक्षा...?



आज ट्रम्प २.० या घटनेने पारंपरिक जागतिकीकरण या ध्येय धोरणाने पूर्णपणे यु टर्न घेतला आहे. ‘मेक अमेरिका ग्रेट अगेन’ या वादळात भारताला आपली ध्येय धोरणे बदलावी लागतील आणि अर्थसंकल्पाद्वारे भारताला पुन्हा एकदा ( सोन्याचा धूर निघू शकेल असे) गतवैभव प्राप्त करावे लागेल. अर्थात यासाठी आवश्यक असेल ते म्हणजे पूर्णपणे रूढार्थाने प्रचलित असलेली विचारसरणी सोडून ‘आऊट ऑफ द बॉक्स’ असा संपूर्ण नवीन विचार मांडणारा, भारताचे भविष्य बदलवू शकेल असा अर्थमंत्री. आणि त्याचे प्रमुख हत्यार असेल येणारा अर्थसंकल्प.ट्रम्प २.० या काळात सर्व जगासाठी अनिश्चिततेतचे वातावरण तयार झालेले आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे अमेरिकेची प्रगती मंदावली तर चीन आणि काही विकसनशील देश प्रचंड प्रगती करू लागले अशा एका कथनामुळे (नॅरेटिव्ह) अमेरिकेने जागतिकीकरणाची साथ सोडून पुन्हा आंतरराष्ट्रीय व्यापारातील संरक्षण धोरण स्वीकारण्याचे जाहीर केले आहे. एलॉन मस्क आणि स्वतः ट्रम्प उद्योजक असल्याने, अमेरिकेतल्या उद्योजकांसाठी धार्जिणे निर्णय घेतले जातील. चीनसह इतर सर्व देशांतून आयत होणाऱ्या वस्तूंवर प्रचंड मोठा आयात कर बसवला जाईल हे आता सर्व जगाला कळून चुकले आहे. अशा परिस्थितीत भारताकडे दोन पर्याय उरतात. एक म्हणजे अमेरिका सांगेल त्या प्रकाराने आयात -निर्यात कर पद्धती स्वीकारून अमेरिकेत निर्यात वाढवणे. चीनकडून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तू कमी होणार असतील तर त्या वस्तूंची निर्यात अमेरिकेच्या अटी मान्य करीत भारताकडून होऊ शकेल. थोडक्यात भारत चीनला पर्याय निर्माण करू शकेल. अर्थात यासाठी भारतीय वस्तूंचा दर्जा उत्कृष्ट असावा लागेल, किंमत कमी असावी लागेल, तसेच अधिक उत्पादनासाठी औद्योगिक धोरण, कामगार कायदे, व्यापार, व्यवसाय नियम, पूर्णपणे बदलावे लागतील. पायभूत सोयी सुविधा या मोठ्या प्रमाणावर निर्माण कराव्या लागतील. त्यासाठी केंद्र, राज्य, स्थानिक शासन संस्था, तसेच वित्त मंत्री, उद्योग वाणिज्य मंत्री, विदेश विभाग मंत्री, कायदा मंत्री, ऊर्जा, वाहतूक, यासारख्या अनेक मंत्रालयांना एकत्र बसून दीर्घकालीन धोरण निश्चित करावे लागेल, मात्र अंमलबजावणी अल्पकाळात सुरू करावी लागेल. यासाठीच पारंपरिक विचारांची चौकात मोडणारा संपूर्ण नवा अर्थविचार मांडावा लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## लिफ्ट अपघात

## लिफ्ट पहिल्या मजल्यावरून खाली कोसळली

# मनोज जरांगे पाटील थोडक्यात बचावले

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मराठा आरक्षणासाठी लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील हे लिफ्ट अपघातामधून बचावले आहेत. बीडमधील शिवाजीराव क्रिटीकल केअर हॉस्पिटलमध्ये एका सहकाऱ्याला भेटायला गेले असताना त्यांची लिफ्ट पहिल्या मजल्यावरून कोसळली. तळमजल्यावरून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी लिफ्टमध्ये गेले. पण क्षमतेपेक्षा अधिक लोक लिफ्टमध्ये शिरल्याने लिफ्ट ओव्हरलोड होऊन लिफ्ट पहिल्या मजल्यावरून तळमजल्यावर कोसळली.**

## आयोग मोदींच्या हातातील बाहुले



या घटनेने रुग्णालय परिसरात खळबळ उडाली. मात्र मनोज जरांगे पाटील यांच्यासह कुणालाही या अपघातात दुखापत झालेली नाही. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओही आता समोर आला आहे.दरम्यान सीसीटीव्हीमध्ये मनोज जरांगे पाटील काही कार्यकर्त्यांसह लिफ्टमध्ये आल्याचे पाहायला मिळत आहे. सदर लिफ्ट रुग्णांसाठी असल्याचे कळते. लिफ्ट सुरू झाल्यानंतर काही वेळातच ती कोसळते. मनोज जरांगे पाटील कार्यकर्त्यांना धीर देण्याचा प्रयत्न करतात. त्यानंतर काही वेळातच रुग्णालयाचे कर्मचारी लिफ्टचा दरवाजा बाजूला करून सर्वांना बाहेर काढतात.रुग्णालयाचे कर्मचारी महारुद्र बडे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, मनोज जरांगे पाटील यांच्यासह अनेकजण आले होते. त्यानंतर जरांगे पाटील लिफ्टमध्ये शिरल्यानंतर त्यांच्यामागोमाग सगळेच आत शिरले. आम्ही त्यांना सांगतो होतो काही लोकांनी पायऱ्यांचा वापर करावा.

पण ओव्हरलोड झाल्यामुळे लिफ्ट पहिल्या मजल्यावरून खाली कोसळली. पण यात कुणालाही इजा किंवा दुखापत झाली नाही.मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसह इतर मागण्यांसाठी २९ ऑगस्ट रोजी जरांगे मुंबईत आंदोलन सुरू करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्व तयारीसाठी त्यांचे शिष्टमंडळ आझाद मैदानासह इतर मैदानाची पाहणी करत आहे. दरम्यान शिष्टमंडळ काही दिवसांपूर्वी मुंबईकडे रवाना होण्याआधी जरांगे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली होती. आमच्या मागण्या जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत मुंबईतून माघारी फिरणार नाही, असा इशारा जरांगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांना दिला होता.दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणातही लक्ष घातले आहे. महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी आयोजित सर्वपक्षीय मोर्चाचे नेतृत्व त्यांनी नुकतेच केले आहे. मनोज जरांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या मेळाव्यात खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते.आठ दिवसांत आरोपींना अटक न झाल्यास बीड जिल्हा बंद करण्यात येईल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी मेळाव्यातून दिला. या मेळाव्यात मराठा समाज मोठ्या भावाच्या भूमिकेतून महादेव मुंडे कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरणार असल्याचे सांगण्यात आले.या घटनेने रुग्णालय परिसरात खळबळ उडाली. मात्र मनोज जरांगे पाटील यांच्यासह कुणालाही या अपघातात दुखापत झालेली नाही. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओही आता समोर आला आहे.दरम्यान सीसीटीव्हीमध्ये मनोज जरांगे पाटील काही कार्यकर्त्यांसह लिफ्टमध्ये आल्याचे पाहायला मिळत आहे. सदर लिफ्ट रुग्णांसाठी असल्याचे कळते. लिफ्ट सुरू झाल्यानंतर काही वेळातच ती कोसळते. मनोज जरांगे पाटील कार्यकर्त्यांना धीर देण्याचा प्रयत्न करतात. त्यानंतर काही वेळातच रुग्णालयाचे कर्मचारी लिफ्टचा दरवाजा बाजूला करून सर्वांना बाहेर काढतात.

### लिफ्ट खाली कोसळली

रुग्णालयाचे कर्मचारी महारुद्र बडे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, मनोज जरांगे पाटील यांच्यासह अनेकजण आले होते. त्यानंतर जरांगे पाटील लिफ्टमध्ये शिरल्यानंतर त्यांच्यामागोमाग सगळेच आत शिरले. आम्ही त्यांना सांगतो होतो काही लोकांनी पायऱ्यांचा वापर करावा. पण ओव्हरलोड झाल्यामुळे लिफ्ट पहिल्या मजल्यावरून खाली कोसळली.

# कोयनेत ९६ टीएमसीची विक्रमी आवक

## धरणसाठा नियंत्रित राखण्यासाठी सहा वक्री दरवाजे दोनदा उघडले

।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोयना धरणात पावसाळ्याच्या मध्यापर्यंतच ९६ टीएमसी, अब्ज घनफूट (धरण क्षमतेच्या ९१.२१ टक्के) अशा विक्रमी पाण्याची आवक होताना, धरणसाठा नियंत्रित राखण्यासाठी सहा वक्री दरवाजे दोनदा उघडून १६.९८ टीएमसी (धरण क्षमतेच्या १६.१३ टक्के) पाण्याचा कोयना नदीपात्रात विनावापर विसर्ग करण्यात आला आहे.**



तर, पायथा वीजगृहातून ६.४८ टीएमसी (धरण क्षमतेच्या ६.१५ टक्के) पाणी वीज निर्मितीसाठी उपयोगात आले आहे. सध्या कोयनेचा धरणसाठा ८७.२३ टीएमसी (धरण क्षमतेच्या ८२.८८ टक्के) असून, जवळपास अर्धा टीएमसी पाण्याची धरणात आवक होत असून, धरण क्षमतेने भरण्यासाठी १८.०२ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. पश्चिम घाटक्षेत्रातील जोरदार पाऊस पूर्णतः ओसरताना, कोयना धरणातून दोन दिवसांपासून संपूर्ण विसर्ग बंद असल्याने तूर्तास तरी कृष्णा-कोयना नद्यांना पूर, महापूर संभवत नसून, दुथडी भरून वाहणाऱ्या या प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत घट होऊ लागली आहे. पावसाचा जोर अगदीच ओसरल्याने खरीप पेरण्यांना दिलासा मिळताना बळीराजाला धीर आला आहे. श्रावणी ऊन-पावसाच्या वातावरणामुळे लोकांमध्ये चैतन्य दिसून येत आहे. कोयना धरणातून जलविसर्ग ठप्प असला तरी, सातारा जिल्ह्यातील कण्हेर धरणातून ७४० क्युसेक, उरमोडीतून ५००, तारळीतून ४९५ क्युसेक असा अन्य प्रमुख जलाशयातून जलविसर्ग करण्यात येत आहे. पावसाळ्याचा बहुतांश कालावधी शिल्लक असताना, सातारा जिल्ह्याचा जलसाठा मात्र, ८५ टक्क्यांच्या घरात पोहचला आहे.

### नद्यांची जलपातळी घटणार

प्रमुख सहा आणि मध्यम व लहान १० अशी १६ धरणे जिल्ह्यात असून, त्यांची पाणीसाठवण क्षमता १५७.४८ टीएमसी असताना या सर्व धरणांमध्ये १३३.८४ टीएमसी (८४.१३ टक्के) जलसाठा उपलब्ध आहे. कोयना धरणाच्या दरवाजातून बंद करण्यात आलेल्या जलविसर्गामुळे कृष्णा-कोयना नद्यांची जलपातळी घटणार असल्याने नद्यांकाठच्या जनतेला दिलासा मिळाला आहे.

## ऑपरेशन सखल कारवाईत भारतीय सैन्यदलाच्या एका जवानाला इजा

# ऑपरेशन सखलद्वारे दोन अतिरेकी ठार!

## सैन्यदलाच्या कारवाईला मोठं यश

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय सैन्यदलाने जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यातील अखल गावात दहशतवादाविरोधात सुरू केलेली मोहीम सलग तिसऱ्या दिवशी सुरू आहे. रविवारी जंगल परिसरात अतिरेकी आणि सशस्त्र दलात उडालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले, तर एक जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे.**



दरम्यान या कारवाईत भारतीय सैन्यदलाच्या एका जवानाला गंभीर इजा झाल्याचीही माहिती मिळत आहे. चार ते पाच अतिरेक्यांचा गट या गावात असल्याचा सशस्त्र दलाचा संशय आहे.तत्पूर्वी शनिवारी झालेल्या कारवाईत दोन अतिरेक्यांना ठार करण्यात यश आल्याचे सैन्यदलाच्या वतीने सांगितले गेले होते. भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने ऑपरेशन अखलची ताजी माहिती देताना म्हटले की, शनिवारी रात्री अधूनमधून गोळीबार सुरू राहिला. सशस्त्र दलाने अतिरेक्यांच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर देत एका अतिरेक्याला ठार केले.शुक्रवारी दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील अखल येथील जंगलात सुरक्षा दलाने घेराबंदी करत शोध मोहीम सुरू केली होती. त्यानंतर अतिरेक्यांकडून गोळीबार करण्यास सुरुवात झाली. शुक्रवारी रात्री दोन्ही बाजूंकडून गोळीबार थांबविण्यात आला होता.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी लष्कराची कुमक या परिसरात वाढविण्यात आली. त्यानंतर सकाळी पुन्हा एकदा गोळीबार सुरू झाला. ज्यात दोन अतिरेकी ठार झाले. जंगलात लपून बसलेल्या अतिरेक्यांची शोधमोहीम हाती घेतल्यानंतर अतिरेक्यांनी गोळीबार सुरू केला होता.

त्याला जवानांनी प्रत्युत्तर दिले, असे लष्करातील अधिकाऱ्याने पीटीआयला दिलेल्या माहितीत म्हटेल. दरम्यान या कारवाईत भारतीय सैन्यदलाच्या एका जवानाला गंभीर इजा झाल्याचीही माहिती मिळत आहे. चार ते पाच अतिरेक्यांचा गट या गावात असल्याचा सशस्त्र दलाचा संशय आहे.तत्पूर्वी शनिवारी झालेल्या कारवाईत दोन अतिरेक्यांना ठार करण्यात यश आल्याचे सैन्यदलाच्या वतीने सांगितले गेले होते. भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने ऑपरेशन अखलची ताजी माहिती देताना म्हटले की, शनिवारी रात्री अधूनमधून

### अतिरेक्यांकडून गोळीबार

लष्कराच्या चिनार कॉर्प्सने ऑपरेशन अखलची ताजी माहिती देताना म्हटले की, शनिवारी रात्री अधूनमधून गोळीबार सुरू राहिला. सशस्त्र दलाने अतिरेक्यांच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर देत एका अतिरेक्याला ठार केले.शुक्रवारी दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील अखल येथील जंगलात सुरक्षा दलाने घेराबंदी करत शोध मोहीम सुरू केली होती. त्यानंतर अतिरेक्यांकडून गोळीबार करण्यास सुरुवात झाली.

गोळीबार सुरू राहिला. सशस्त्र दलाने अतिरेक्यांच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर देत एका अतिरेक्याला ठार केले.शुक्रवारी दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील अखल येथील जंगलात सुरक्षा दलाने घेराबंदी करत शोध मोहीम सुरू केली होती. त्यानंतर अतिरेक्यांकडून गोळीबार करण्यास सुरुवात झाली. शुक्रवारी रात्री दोन्ही बाजूंकडून गोळीबार थांबविण्यात आला होता.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी लष्कराची कुमक या परिसरात वाढविण्यात आली. त्यानंतर सकाळी पुन्हा एकदा गोळीबार सुरू झाला. ज्यात दोन अतिरेकी ठार झाले. जंगलात लपून बसलेल्या अतिरेक्यांची शोधमोहीम हाती घेतल्यानंतर अतिरेक्यांनी गोळीबार सुरू केला होता. त्याला जवानांनी प्रत्युत्तर दिले, असे लष्करातील अधिकाऱ्याने पीटीआयला दिलेल्या माहितीत म्हटेल.भारतीय सैन्यदलाने जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यातील अखल गावात दहशतवादाविरोधात सुरू केलेली मोहीम सलग तिसऱ्या दिवशी सुरू आहे. रविवारी जंगल परिसरात अतिरेकी आणि सशस्त्र दलात उडालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले, तर एक जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे.चार ते पाच अतिरेक्यांचा गट या गावात असल्याचा सशस्त्र दलाचा संशय आहे.तत्पूर्वी शनिवारी झालेल्या कारवाईत दोन अतिरेक्यांना ठार करण्यात यश आल्याचे सैन्यदलाच्या वतीने सांगितले गेले होते.

# लोकसभा निवडणुकांमध्येही गैरप्रकार

## देशातील निवडणूक यंत्रणा मृतवत राहुल गांधी यांची टीका

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशाताली निवडणूक यंत्रणा आधीच मृतवत झाली आहे, असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी निवडणूक आयोगावरील हल्ला आणखी तीव्र केला. मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्येही गैरप्रकार झाले होते असा आरोपही राहुल यांनी केला. दिल्लीमधील विज्ञान भवन येथे काँग्रेसतर्फे एकदिवसीय राज्यघटनेसमोरील आव्हाने या विषयावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.**



त्यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अगदी कमी संख्याबळाने आपल्या पदावर आहेत आणि काही जागांचा फरक पडला असता तर ते त्यांच्या खुर्चीत नसते असा दावा राहुल यांनी केला. यावेळी त्यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीसंबंधी काँग्रेसने संकलित केलेल्या डेटाचे उदाहरण दिले. पक्षाने एका मतदारसंघामध्ये ६.५ लाख मतदारांचे छायाचित्र आणि नावे यांची प्रत्यक्ष पडताळणी केली असून त्यामध्ये १.५ लाख मतदार

### निवडणूक आयोगाला लक्ष्य केले


त्यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अगदी कमी संख्याबळाने आपल्या पदावर आहेत आणि काही जागांचा फरक पडला असता तर ते त्यांच्या खुर्चीत नसते असा दावा राहुल यांनी केला. यावेळी त्यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीसंबंधी काँग्रेसने संकलित केलेल्या डेटाचे उदाहरण दिले.

बनावट असल्याचे आढळले, असे काँग्रेसकडून सांगण्यात आले आहे. “आम्ही हा डेटा प्रसिद्ध करून तेव्हा निवडणूक यंत्रणेत काय घडत आहे याविषयी तुम्हाला धक्का बसणार आहे. हे अक्षरशः अणुबॉम्बसारखे आहे,” असा दावा राहुल गांधी यांनी चर्चासत्रात बोलताना केला. आपल्याकडे या गैरप्रकारांचा १०० टक्के पुरावा आहे असे राहुल म्हणाले.राज्यघटनेचे संरक्षण आणि बचाव करणारी संस्था नष्ट झाली असून ती इतरांनी ताब्यात घेतली आहे अशी टीका त्यांनी निवडणूक आयोगावर केली.कृपया हे लक्षात घ्या की देशाच्या पंतप्रधानांकडे अगदी थोडक्यात बहुमत आहे. जर १० ते १५ जागांमध्ये गैरप्रकार झाले

# सावंत यांच्याकडून 'पारू' फेम दामिनी शिकली 'ही' गोष्ट

निर्मिती सावंत यांनी अनेक चित्रपट तसेच मालिकांमध्ये काम केले आहे. त्यांच्या अभिनयाचा एक वेगळा चाहतावर्ग आहे. अनेक कलाकारही त्यांच्या अभिनयाचे चाहते आहेत. निर्मिती सावंत यांची 'पारू' आणि 'लक्ष्मी निवास' या मालिकांच्या महासंगममध्ये एन्ट्री झाल्याचे पाहायला मिळाले. पद्मावती हे पात्र त्यांनी साकारले होते. लक्ष्मी, अहिल्या व पद्मावती या जुन्या वर्गमैत्रीणी होत्या. मात्र, कॉलेजमध्ये शिकत असताना पद्मावतती आणि लक्ष्मी व अहिल्या यांच्यात गैरसमज निर्माण झाले होते. त्याचा राग इतक्या वर्षानंतरही पद्मावरतीच्या मनात होता. अनेक वर्षांनी भेटल्यानंतर पद्मावतीने लक्ष्मी व अहिल्याला मंगळागौरीच्या स्पर्धेचे चॅलेंज दिले. ते लक्ष्मी व अहिल्या यांनी स्विकारले. त्यानंतर मोठी चढा ओढ पाहायला मिळाली.आता अभिनेत्री श्रुतकिर्ती सावंतने निर्मिती सावंत यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. अभिनेत्रीने नुकताच 'मराठी मनोरंजन विश्व'शी संवाद साधला. यावेळी ती म्हणाली, "त्यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव खूप कमाल आहे. ज्येष्ठ कलाकारांबरोबर काम करताना त्यांच्याकडून काही ना काही शिकायला मिळते. मजा येते. मी निर्मिती ताईंना





जितकं पाहिलं, त्यांचं निरिक्षण केलं, त्यावरुन जाणवलं की त्या खूप शांत आहेत.त्या त्यांची वाक्य शांतपणे वाचतात. एका सीनचे शूटिंग संपले की त्या एका कोपऱ्यात जाऊन बसतात. तिथे त्या पुढच्या सीनसाठी तयारी करतात. परत, पुढच्या सीनसाठी छान ऊर्जेने येऊन उभ्या राहतात. तर मी त्यांच्याकडून हे शिकले की आता थांबायचं नाही, काम करत राहायचं", अशा भावना व्यक्त केल्या.श्रुतकिर्ती सावंतने पारू मालिकेत दामिनी ही भूमिका साकारली आहे. स्वत:ला मान सन्मान मिळावा यासाठी सतत धडपड करत असणारी, अनेकदा त्यासाठी कट कारस्थाने करणारी, तसेच तिच्या डायलॉगने प्रेक्षकांना हसवणारी अशी ही दामिनी आहे. पारूला त्रास देण्यासाठी ती वेळोवेळी दिशाला मदत करत असल्याचे दिसते. अनेकदा ती अहिल्याची बोलणीदेखील खाते.

## मीसुद्धा सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो

चार वर्षं उलटून गेली तरी अजूनही सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबद्दल चर्चा होताना दिसत आहे. त्याचे चाहते अजूनही या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. सुशांतच्या मृत्यूमागचं गूढ हे अजूनही कायम आहे. पोलिसांनी जरी त्याची केस बंद केली असली तरी याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःच्या मेहनतीवर सुशांतने चित्रपटसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.सुशांतच्या याच स्ट्रगलबद्दल नुकतंच अभिनेता विवेक ओबेरॉयने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर सुशांतच्या अंत्यसंस्कारावेळी विवेक स्वतः तिथे उपस्थित होता. त्यावेळी सुशांतच्या वडिलांना पाहून त्याला काय भावना मनात दाटल्या याबद्दल विवेकने खुलासा केला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या अडचणीच्या काळात आपणही सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो हेदेखील विवेकने स्पष्ट केलं.

## मेधाने सांगितला प्रवास

विक्रांत मेसी आणि मेधा शंकर अभिनीत '12TH फेल' २०२३ चा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला होता. फक्त २० कोटी बजेट असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ६६.५८ कोटींची कमाई केली. ६९ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात '12TH फेल' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट प्रेक्षकांसह अनेक कलाकारांच्या पसंतीस उतरला आणि त्यांनी भरभरून या चित्रपटाचं कौतुक केलं. या चित्रपटात विक्रांत मेसी याने मनोज शर्मा, तर मेधा शंकरने श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारली होती.'12TH फेल' चित्रपट २५० भारतीय चित्रपटांच्या यादीत सामील झाला आहे. अशातच चित्रपटात श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारणाऱ्या मेधा शंकरला आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण आली. तिने सांगितले की एक काळ असा होता जेव्हा तिच्या बँकेच्या खात्यात फक्त २५७ रुपये शिल्लक होते.अलीकडेच आयएमडीबीला (IMDB) दिलेल्या मुलाखतीत मेधा शंकरने तिच्या संघर्षातील दिवसांची आठवण सांगितली. ती म्हणाली, '12TH फेल' चित्रपटाचा भाग होण्यासाठी तिला खूप वेळ लागला. मेधाने २०१८ मध्ये मुंबईत अभिनेत्री म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने या चित्रपटासाठी कास्टिंग एजन्सीकडे पहिल्यांदा ऑडिशन दिले. नंतर ती दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आणि त्यांच्या टीमबरोबर स्क्रीन टेस्टसाठी गेली.ऑडिशनदरम्यान मेधाला हा रोल तिच्यासाठीच आहे अस वाटलं होतं.



## महिलांनी मुलांच्या संगोपनासाठी घरी राहावं

अभिनेत्री काजोल (KAJOL) आणि तिची बहीण तनिषा (TANISHAA) या ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा (TANUJA) यांच्या मुली आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा यांनी यापूर्वी सांगितले होते की, अभिनय ही त्यांची आवड नव्हती, पण आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना हा मार्ग स्वीकारावा लागला. कुटुंबाच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांना खूप मेहनत करावी लागली, कारण त्यांना घर आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागली. ही संघर्षमय परिस्थिती पुढेही सुरू राहिली, तनुजा आणि त्यांचे पती शोमू मुखर्जी यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतल्यानंतर तनुजांवर त्यांची दोन्ही मुली – काजोल आणि तनिषा यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आली. तनुजा यांच्या मुलींनाही त्यांच्या आईच्या सतत कामानिमित्त घराबाहेर राहण्याची सवय झाली. मात्र, अलीकडील एका मुलाखतीत तनिषाने सांगितले की, माझी इच्छा होती की माझी आई जर काम न करता घरी आमच्याजवळ राहायला हवी होती असे वाटते. तिने हेही म्हटले की, महिलांनी किमान पाच वर्षे आपल्या मुलांवर लक्ष केंद्रित करून नंतरच काम करावे.HAUTTERFLY ला दिलेल्या एका मुलाखतीत तनिषाने सांगितले, "माझी आई आम्ही लहान असताना कामावर जात असे, जर ती कामावर न जाता आमच्याजवळ राहिली असती तर चांगलं झालं असतं. जेव्हा माझा जन्म झाला, तेव्हा आमच्याकडे पुरेसं आर्थिक स्थैर्य नव्हतं, त्यामुळे आईला काम करावं लागलं. ती दिवसाला दोन ते तीन शिफ्टमध्ये काम करत असे. त्यामुळे मला आईला भेटण्याची संधीच मिळत नसे. यामुळे मी तिच्या खोलीत झोपत असे, कारण त्यामुळे मला तिच्या जवळ असल्यासारखं वाटायचं."

## माधुरीचा 'हम आपके है कौन'चा खास लूक

बॉलीवूडमधील धक धक गर्ल माधुरी दीक्षित आजही तिच्या अभिनयासह नृत्य कौशल्यामुळे चर्चेत आहे. १९९४ रोजी प्रदर्शित झालेला 'हम आपके है कौन' या चित्रपटातील माधुरी दीक्षित आणि सलमान खानची जोडी लोकप्रिय ठरली होती. यात अभिनेत्री विविध प्रकारच्या मॉडर्न आणि एथिनिक लूकमध्ये दिसली होती. या चित्रपटातील गाणी आणि कथानकामुळे चित्रपट हिट झाला होता.मोठ्या कुटुंबासह मित्रपरिवारासमवेत होणाऱ्या भव्य लग्नसोहळ्याचा ट्रेंड त्याकाळी चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. चित्रपटात हिंदी सिनेसृष्टीतल्या दिग्गज कलाकारांसह मराठमोळे कलाकारही होते. रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोक नाथ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया बेर्डे अशी स्टारकास्ट या चित्रपटाला लाभली होती.'हम आपके है कौन' चित्रपटातील 'दीदी तेरा देवर दीवाना' हे गाणं तेव्हा खूप प्रसिद्ध झालं होतं. या गाण्यामधील माधुरी दीक्षितच्या जांभळ्या रंगाच्या साडीने आणि बॅकलेस ब्लाऊजने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. प्रसिद्ध डिझायनर अण्णा सिंग यांनी त्यावेळी ही साडी डिझाइन केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी तब्बल ₹१.५ दशलक्ष किंमतीची ही साडी केवळ फॅशन स्टेटमेंटच नव्हती, तर तिच्या अनोख्या बॅकलेस ब्लाउज आणि फूल स्लीव्हजसह त्याकाळी चर्चेचा विषय ठरली.तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा माधुरीने 'दीदी तेरा देवर दीवाना' या गाण्यातील जांभळ्या साडीमधला लूक रिक्रिएट केला आहे. या लूकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'डान्स दिवाने'च्या रिॲलिटी शोसाठी माधुरीने या आउटफिटची निवड केली आहे.



## रूटचं शतक — हेडबँड लावत ‘ग्राहम थोर्पला’ समर्पित केली विक्रमी खेळी

# विषय गंभीर तिथे रूट खंबीर!

## ओव्हल कसोटीचा निकाल लागणार का?



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूटने भारतीय संघाविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत दमदार कामगिरी केली आहे. भारतीय संघाने दिलेल्या ३७४ धावांचा पाठलाग करताना त्याने दमदार शतकी खेळी केली. या डावात फलंदाजी करताना त्याने १५२ चेंडूंचा सामना करत १२ चौकारांच्या साहाय्याने १०५ धावांची खेळी केली. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ३९ वे शतक ठरले आहे. तर मायदेशात फलंदाजी करताना हे त्याचे २४ वे शतक ठरले आहे. यादरम्यान त्याच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.**

हे शतक जो रूटसाठी अतिशय खास ठरलं आहे. कारण या शतकी खेळीसह त्याने मायदेशात फलंदाजी करताना सर्वाधिक शतकं झळकावण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने या विक्रमात महेला जयवर्धने, रिकी पाँटींग आणि जॅक कॅलिस यांना मागे टाकलं आहे. या तिघांनी मायदेशात फलंदाजी करताना प्रत्येकी २३ शतकं झळकावली आहेत. आता जो रूट एक पाऊल पुढे निघाला आहे. जो रूटने २४ शतकांचा पल्ला गाठला आहे. यासह तो मायदेशात खेळताना सर्वाधिक शतकं झळकावणारा फलंदाज ठरला आहे. या शतकासह त्याने ३ दिग्गज खेळाडूंना मागे टाकलं आहे.यासह रूटने कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत कुमार संगकाराला मागे टाकलं आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो चौथ्या स्थानी पोहोचला आहे. या यादीत कुमार संगकारा पाचव्या स्थानी पोहोचला आहे.कुमार संगकाराच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये ३८ शतकं झळकावण्याची नोंद आहे. आता रूटच्या नावे ३९ शतकं झळकावण्याची नोंद आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सचिन तेंडुलकर अव्वल स्थानी आहे. सचिनने ५१ शतकं झळकावली आहेत. तर दुसऱ्या स्थानी असलेल्या जॅक कॅलिसने ४५ आणि रिकी पाँटींगने ४१ शतकं झळकावली आहेत.भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडकडून जॅक क्रॉली आणि बेन डकेट यांनी दमदार अर्धशतकी भागीदारी केली. जॅक क्रॉलीने १४ आणि बेन डकेटने ५४ धावांची खेळी केली. तर ओली पोपने २७ धावांची खेळी केली. जो रूटने १०५ धावा केल्या. तर हॅरी ब्रुकने १११ धावांची खेळी केली. इंग्लंडने चौथ्या दिवसाअखेर ६ गडी बाद ३३९ धावा केल्या आहेत. पाचव्या दिवशी फलंदाजी करताना भारतीय संघाला ४ गडी बाद करायचे आहेत. तर इंग्लंडला विजयासाठी आणखी ३५ धावांची गरज आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचवा कसोटी सामना शेवटच्या टप्प्यात पोहोचला आहे. भारतीय संघाने विजयासाठी इंग्लंडसमोर ३७४ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडला दमदार सुरुवात मिळाली आहे.३५ धावांची गरज असताना पावसाने हजेरी लावली. त्यामुळे दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. दरम्यान पाचव्या दिवशी कसं असेल हवामान? जाणून घ्या.ॲक्यूवेदरने दिलेल्या वृत्तानुसार, ४ ऑगस्टला पाऊस पडण्याची शक्यता ही ६० टक्के इतकी असणार आहे. हा सामना स्थानिक वेळेनुसार सकाळी ११ वाजता सुरू होणार आहे. त्यावेळी पाऊस पडण्याची शक्यता ही ५ टक्के इतकी असणार आहे. दुपारी २,३ आणि ४ वाजता पाऊस पडण्याची शक्यता ही ६० टक्के इतकी असणार आहे. पण सामना इतका वेळ सुरू राहण्याची शक्यता खूप कमी आहे. कारण इंग्लंडला विजयासाठी ३५ धावांची गरज आहे. तर भारतीय संघाला केवळ ४ गडी बाद करायचे आहेत. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या २२४ धावांवर आटोपला

### इंग्लंडला ३५ धावांची गरज

होता. पहिल्या डावात कमी धावा केल्यानंतर दुसऱ्या डावात भारतीय फलंदाजांनी दमदार कामगिरी केली. दुसऱ्या डावाच्या सुरुवातीला भारतीय संघाला मोठा धक्का बसला. केएल राहुल स्वस्तात माघारी परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या आकाशदीपने ६६ धावांची दमदार खेळी. त्याने यशस्वी जैस्वालसोबत मिळून १०० धावांची भागीदारी केली.

# ९ फलंदाजांनी मिळून घडवला इतिहास

## गिलसह आणखी 4 फलंदाजांनी 400 धावांचा पल्ला गाठला



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या कसोटी मालिकेत दोन्ही संघांतील फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला आहे. या मालिकेत फलंदाजी करताना भारतीय फलंदाजांनी १२ तर इंग्लंडच्या फलंदाजांनी ७ असे एकूण १९ शतकं झळकावले आहेत. भारतीय संघाकडून फलंदाजी करताना एकट्या गिलने ४ शतकं झळकावली आहेत. या शतकांसह त्याने ४०० धावांचा पल्ला गाठला आहे.**

गिल या मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याच्या नावे ७५४ धावा करण्याची नोंद आहे. यादरम्यान या मालिकेत एक दुर्मिळ विक्रम बनवला गेला आहे.या मालिकेत भारतीय कर्णधार शुबमन गिलसह आणखी ४ फलंदाजांनी ४०० धावांचा पल्ला गाठला आहे. भारताकडून ५ तर इंग्लंडकडून एकूण ४ फलंदाजांनी ४०० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. यासह कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच असं घडलं आहे की, दोन्ही संघातील ९ फलंदाजांनी ४०० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. याआधी १९७५-७६ मध्ये असं घडलं होतं. वेस्ट इंडिज आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या सामन्यात ८ फलंदाजांनी ८०० पेक्षा अधिक धावा केल्या होत्या.यासह १९९३ मध्ये झालेल्या ॲशेस मालिकेत एकूण ८ फलंदाजांनी ४०० पेक्षा अधिक धावा केल्या होत्या. या मालिकेत फलंदाजी करताना केएल राहुलने ५३२, रवींद्र जडेजाने ५१६, ऋषभ पंत ४७९, बेन डकेट ४६२, जो रूटने ४५५, जेमी स्मिथने ४३२, यशस्वी जैस्वालने ४११ आणि हॅरी ब्रुकने ४०८ धावा केल्या आहेत.हा सामना जिंकण्यासाठी इंग्लंडसमोर ३७४ धावांचं आव्हान आहे. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडकडून जॅक क्रॉउली आणि बेन डकेट यांनी मिळून अर्धशतकी भागीदारी केली

### फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला

.बेन डकेटने ५४ धावांची खेळी केली. जॅक क्रॉउलेने १४ धावांची खेळी केली. तर हॅरी ब्रुकने शतकी खेळी केली. इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी १०० हून कमी धावांची गरज आहे. इंग्लंडचा संघ मालिका जिंकण्याच्या अगदी जवळ पोहोचला आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या कसोटी मालिकेत दोन्ही संघांतील फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला आहे.


स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। सोमवार ।
। दि. 4 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

DYP DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY

# DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY, AKURDI, PUNE

NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC




Institute code : 6371

## STUDENT INTAKE

| | |
|---|---|
| D. Pharm | 60 |
| F. Y. B Pharm | 100 |
| Pharm D | 30 |
| Pharm D (PB) | 10 |
| M Pharm ((Pharmaceutics) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Quality Assurance) | 15 |
| M Pharm (Pharmacology) | 15 |
| M Pharm (Regulatory Affairs) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Chemistry) | 06 |
| M Pharm (Phytopharmacy & Phytomedicine) | 09 |

www.dyppharmaakurdi.ac.in | @dypcopakurdipune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

।पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



> “ विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेल्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org